**दि चिल्ड्रेन्स् एड् सोसायटी मधील कर्मचाऱ्यांकरीता प्रशिक्षण वर्गांचे आयोजन-**
**बाल न्याय अधिनियमाच्या (काळजी व संरक्षण कायदा) प्रभावी अंमलबजावणी करीता लाभणार तज्ञांचे मार्गदर्शन**

संस्थेच्या सर्व विभागातील व सर्व प्रकारच्या पदांवर कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता संस्था प्रशासनाने तीन आठवड्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. JSW व IJM आणि दि चिल्ड्रेन्स् एड् सोसायटीच्या संयुक्त् विद्यमाने या प्रशिक्षण वर्गांचे डेव्हिड ससून माटुंगा येथील भव्य् अशा सभागृहात प्रभावी नियोजन करण्यात आले आहे. बालन्याय अधिनियममान वेळोवेळी झालेले बदल समाविष्ट् करण्यात आलेल्या तरतुदी यांची माहिती व या अधिनियमांच्या प्रभावाखाली येणाऱ्या घटकांशी कशा प्रकारे समन्वय् साधला जावा याबाबत तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे व विचारमंथन या प्रशिक्षण वर्गात होणार आहे. तीन आठवडे चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात संस्थेतील गृहपाल व रक्षक पदावरिल कर्मचाऱ्यांकरिता मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पुढील दोन आठवडे अधिक्षक, परिविक्षा अधिकारी, वैद्यकीय विभागातील कर्मचारी, मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचारी शिक्षक-निदेशक यांच्या करिता अभ्यासवर्ग चालू राहणार आहे.

दि चिल्ड्रेन्स् एड् सोसायटी च्या मुंबई विभागातील ०७ बालगृहात मोठ्याप्रमाणात काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके दाखल होतात. त्यामुळे बालअधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये या संस्थेचा मोठा वाटा आहे येथील कर्मचारी वर्ग ही बालहक्कांबाबत जागृक बालकांप्रती संवेदनशील आहे. म्हणूनच बालअधिनियमांबाबत त्यांचे ज्ञान अद्ययावत व्हावे म्हणून संस्थेचे मुख्याधिकारी मा.श्री.प्रवीण भावसार साहेब यांच्या मार्गदर्शनाने व उपमुख्याधिकारी मा.श्री.सतीश बनसोडे साहेब यांच्या पुढाकाराने या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात JSW व IJM या स्वयंसेवी संस्थानी सहयोग केल्याने हा उपक्रम यशस्वी रित्या राबविला जात आहे. गेल्या तीन दिवसात याठिकाणी तज्ञ मार्गदर्शक म्हणून मा.श्री.संतोष शिंदे (सदस्य् बालहक्क् आयोग, महाराष्ट्र् राज्य्), मा.श्री.यशुदास नायडू, श्री.स्वप्नील भोपटे, श्रीमती शालीनी व श्रीमती फिबी यांनी उपस्थिती दर्शवत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गामुळे बाल अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता उपयुक्त् माहिती मिळाली, बालमानसशास्त्राचे ज्ञान मिळाले व याचा भविष्यात नक्की उपयोग होईल अशा भावना प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांनी व्यक्त् केल्या.



Desk/PatelMadamFinal








Desk/PatelMadamFinal